स्पेशल दिवाणी दावा कं.०४/२०१७
(जुना स्पेशल दिवाणी दावा कं.११३८/२०११)
लिला+२ वि. मिरांजली+५
नि.क.१०० खाली

**साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरू.**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास वादींतर्फे आर.जी. बारई</u>**

१. वादी कं.१ लिलाबाई हिचा जगदीश नारनवरे यांच्यासोबतचा विवाह दि.१०.०५.१९७१ रोजी झाला होता हे मला माहिती नाही. निशाणी ६१ वरील विवाह प्रमाणपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी कं.२ व ३ हे लिलाबाई व जगदीश यांची अपत्ये आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ६२ वरील करपावतीनुसार वादमिळकत जगदिश नारनवरे यांच्या नावे नोंदलेली आहे. निशाणी ६५ वरील प्रमाणपत्र जगदिश नारनवरे यांनी फॅमिली प्लॅनिंग ऑपरेशन केल्याबाबत असल्याचे बरोबर नाही. निशाणी ६६ वरील शपथपत्र खोटे आहे. निशाणी ६६ वरील फोटोग्राफ कुणाचे आहे हे मला सांगता येणार नाही. निशाणी ६८ वरील रेशनकार्ड दस्त खोटा आहे. निशाणी ६९ वरील निवडणुक ओळखपत्र खोटे आहे. निशाणी ७० वर जगदिश नारनवरे यांनी वारसाप्रमाणपत्र मिळविण्याकरीता दिलेल्या अर्जाची प्रत असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी मला वकीलांमार्फत नोटीस पाठविला होता. पोचपावती निशाणी ७६ वर माझी सही आहे. मी वादी यांना कुठलाही नोटिस जबाब पाठविला नव्हता.

२. वादी यांचे दाव्याला मी लेखी जबाब दाखल केला किंवा नाही हे मला आठवत नाही. जगदिश नारनवरे हे सुरूवातीला नागपुर येथे नोकरीला होते ही बाब बरोबर आहे. माझे लेखी जबाब निशाणी २८ मधील **<u>अधोरेखांकीत भाग ‘अ’</u>** कुठल्या नातेसंबंधाने लिहीण्यात आला हे मला

सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रं.१ ही जगदिश यांची कायदेशिर पत्नी होती. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्रं.२ व ३ हे वादी क्रं.१ तसेच जगदिश यांचे कायदेशिर मुले आहेत. जगदिश नारनवरे यांचा विवाह शशिकला नामक महिलेसोबत झाला होता हे दर्शविण्याकरीता मी कुठलाही कागदोपत्री पुरावा प्रकरणात दिला नाही. मी जगदिश व शशिकला यांचे विवाहाची तारीख माझे लेखी जबाबात नमुद केलेली नाही. माझा जगदिश नारनवरे व शशिकला यांच्यापासुन जन्म झाल्याचे दर्शविण्याकरीता मी जन्माचा दाखला प्रस्तुत दाव्यात दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जन्माच्या दाखल्यामध्ये वडीलांचे तसेच आईच्या नावाची नोंद असते. हे म्हणणे खरे नाही की, जगदिश नारनवरे माझे वडील नाहीत व त्यामुळे मी जाणुनबजुन जन्माचा दाखला प्रकरणात दाखल केलेला नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, जगदिश नारनवरे यांची नागपुर येथुन भिवापुर येथे बदली झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, जगदिश नारनवरे यांच्या हाताखाली दहा ते बारा मजुर लोक होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा जन्म झाल्यानंतर माझी आई जगदिश नारनवरे यांच्याकडे मजुर म्हणुन कामावर रूजु झाली. जगदिश नारनवरे यांचे भिवापुर येथे स्वत:चे घर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जगदिश नारनवरे यांचे भिवापुर येथे घर नव्हते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, भिवापुर येथील घर देवनाथ अभिमान गजघाटे यांचे होते हे मी खोटे सांगत आहे. भिवापुर येथील घर देवनाथ गजघाटे यांचे होते हे दर्शविण्याकरीता मी मालकीहक्काचा दस्त दाव्यात दिलेला नाही. देवनाथ गजघाटे यांचे घराचा ग्रामपंचायत घर क्रमांक कुठला होता हे मी माझे लेखी जबाबात नमुद केलेले नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, जगदिश चंद्रभान नारनवरे यांनी दि. २०.०५.२००२ रोजी माझे नावे मृत्युपत्राचा लेख करून दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०.०५.२००२ दरम्यान जगदिश नारनवरे यांना चालता फिरता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०. ०५.२००२ दरम्यान जगदिश नारनवरे यांना सही करता येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, जगदिश नारनवरे यांना मृत्युपत्रातील लिखाणबाबत कुठलेही भान नव्हते व मजकुर लिहीता वाचता येत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०.०५.२००२ च्या मृत्युपत्रावर असलेली स्वाक्षरी जगदिश नारनवरे यांच्या नेहमीच्या स्वाक्षरीप्रमाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, जगदिश नारनवरे यांच्याकडुन मालमत्ता हडप करण्याकरीता मी दि.२०.०५. २००२ रोजीचा मृत्युपत्राचा लेख तयार करून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०.०५.२००२ च्या मृत्युपत्रामध्ये मी जाणुनबुजुन जगदिश यांच्या कायदेशिर पत्नीचा व मुलांचा उल्लेख करण्याचे टाळले.

५. मी शकुंतला कपाटे यांना ओळखते. त्या माझे सासु आहेत. शकुंतला कपाटे हया भिवापुर ग्रामपंचायत मध्ये सभासद होत्या हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, शकुंतला कपाटे यांच्या मदतीने मी वादातील मालमत्ता मृत्युपत्राच्या आधारे माझे एकटीच्या नावे नोंदवुन घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशिरपणे वादातील मालमत्ता प्रतिवादी क्रं.२ ते ४ यांना विक्री केली. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०४. २०११ रोजीचे विक्रीपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये वादी क्रं.१ ते ३ यांचा कायदेशिर हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादातील मालमत्ता मी खोटया पध्दतीने स्वत:च्या नावे करून घेतली व विक्री केली. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी दाखल केलेला

दावा कायदेशिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मृत्युपत्राआधारे विक्रीपत्र करून देण्याचा कुठलाही कायदेशिर अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**
**फेरतपास काही नाही**.

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृती

(एस. के. फोकमारे)
दि.न्या.व.स्तर, उमरेड
दिनांक : १३/०१/२०२०.

(एस. के. फोकमारे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर.,
उमरेड